दैनिक
# साहसिक
epaper
www.sahsik.com
सजग समाजाचा दक्ष प्रहरी

वर्धा, नागपूर, भंडारा, गोंदिया, अमरावती, अकोला, बुलडाणा, वाशिम,यवतमाळ, चंद्रपूर, गडचिरोली, दिल्ली व मुंबई येथुन एकाचवेळी प्रकाशित ...!

वर्ष : १५ अंक : १२२ शुक्रवार १२ नोव्हेंबर २०२१ मुख्य संपादक : रविंद्र एन. कोटंबकार (पृष्ठ -८) मूल्य : ३ रुपये

### सुविचार

'स्त्रियांना एक तऱ्हेच नियम लागू करणे व पुरुषांना दुसरा नियम लागू करणे हा निव्वळ पक्षपात होय.'
-महात्मा फुले

### चारोळी

मऊपण काय असत
हे तिच्या एका स्पर्शाने
सांगितलं
त्या एका स्पर्शातच मी
तीच प्रेम मागितलं.

### हसा जरा जपून..

आयुष्यात इतकी मान खाली घालायची वेळ कधीच आली नव्हती.
जितकी व्हाट्सअँप फेसबुक मुळे आली आहे !

## डॉ. स्नेहल लुणावत मृत्यू प्रकरणात कोव्हीशील्ड व्हॅक्सीन बनविणाऱ्या सीरम इंस्टिट्यूट चे मालक आदर पुणावाला, सह दोषी डॉक्टर्स व अधिकाऱ्यांविरुद्ध हत्या, फसवणूक व शासकीय निधीचा दुरुपयोग आदी गुन्हे दाखल करण्याची इंडियन बार असोसिएशनची व इतर संघटनांची मागणी

* महिला डॉक्टरचा मृत्यू कोव्हीशील्ड च्या दुष्परीणामांमुळे झाल्याचे भारत सरकारच्या AEFI समितीकडून मान्य.
* लस पूर्णतः सुरक्षित आहे असा खोटा प्रचार करणारे डॉ. व्ही. जी. सोमाणी, डॉ.रणदीप गुलेरीया आणि त्यांच्या सहकारी आरोपींना त्वरीत अटक करण्याची मागणी. लस घेणाऱ्यांमध्ये हृदयविकारांचे व इतर जीवघेण्या दुष्परीणामांचे प्रकार वाढल्याचा दावा.
* देशातील विविध संघटनांकडून पाठींबा.
* दिल्लीत, मुंबईत निघणार लाखोंचा लोकांचा एतिहासिक मोर्चा.
* फौ. प्र. संहिताचे कलम ४३ नुसार नागरिक स्वतः आरोपी डॉक्टरांना अटक करणार.



**साहसिक वृत्त / ११ नोव्हेंबर**

**नवी दिल्ली:** लोकांचे आजारापासून रक्षण करणारे कोरोना योद्धा डॉक्टर्सलाच फार्मा माफियाच्या कट कारस्थानामुळे जीव गमवावा लागला असून औरंगाबादच्या डॉ. स्नेहल लुणावत यांच्या मृत्यूस जबाबदार दोषी अधिकाऱ्यांना त्वरित अटक करण्याकरीता व पुढचे मृत्यू रोखण्याकरीता इंडियन बार असोसिएशन, डॉक्टर्स फॉर ट्र्युथ, अव्हेकन इंडिया मुव्हमेंट, स्वदेशी भारत आंदोलन, मानव अधिकार सुरक्षा परिषद, किसान संघटन अश्या विविध ३०० संघटनांनी दिल्ली येथे लाखों लोकांचा एतिहासिक मोर्चा काढणार असल्याची माहिती समन्वयक श्री. अंबर कोईरी यांनी दिली.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, डॉ. स्नेहल लुणावत वय ३२ वर्षे ह्या नाशिक मधील इगतपुरी वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयात अध्यापनाचे काम करीत होत्या.

कोरोनाची लस मार्केट मध्ये येताच व्हॅक्सीन कंपनीच्या लोकांनी भ्रष्ट अधिकाऱ्यांना हाताशी धरुन लस लस पूर्णतः सुरक्षित आहे असा खोटा प्रचार करुन तसेच कोरोना योद्धा यांना लस द्यावीच लागेल असा दबाव निर्माण करुन २८ जानेवारी रोजी त्यांना लस देण्यात आली.

३. त्यानंतर त्यांना त्रास होऊ लागल्यानंतर स्थानिक डॉक्टरांनी माईल्ड माइग्रेन असल्याचे निदान करून औषधेही दिली होती. दरम्यान, त्या दिल्ली येथे एका कार्यक्रमासाठी गेल्यानंतर त्यांची प्रकृती बिघडली. विशेषतः मेंदूत रक्ताची गाठ झाल्यानंतर नोएडा येथील एका रुग्णालयात त्यांना दाखल करण्यात आले. पंधरा दिवस तेथे उपचार केल्यानंतर त्यांना त्यांच्या वडिलांच्या घरी औरंगाबाद येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. तेथे सात दिवसांनंतर म्हणजे १ मार्चला त्यांचा मृत्यू झाला.

४. त्यांच्या कुटुंबीयांनी आधी 'कोव्हीशील्ड' लस उत्पादित करणाऱ्या 'सीरम इंस्टिट्यूट', पुणे या कंपनीला कळविले आणि त्यानंतर शासनाकडेही तक्रार केली होती. 'कोव्हीशील्ड' च्या लसीकरणाच्या दुष्परिणामांमुळेच डॉ. स्नेहल यांचा मृत्यू झाला, अशी तक्रार कुटुंबीयांनी केली होती.

सुरवातीला कोव्हीशील्ड कंपनीने व सरकारी अधिकाऱ्यांनी तो मृत्यू लसीच्या दुष्परीणामांमुळे झाल्याचे मान्य करण्यास नकार दिला. परंतु केंद्र शासनाच्या आरोग्य व कुटुंबकल्याण मंत्रालयाकडे पाठपुरावा केल्यानंतर त्यांनी नियुक्त केलेल्या 'एईएफआय' समितीने नुकताच अहवाल दिला असून, महिला डॉक्टरचा मृत्यू झाल्यानंतर त्यांच्या पालकांनी केलेल्या तक्रारीत तथ्य आढळले असून, कोरोना प्रतिबंधक लसीकरणामुळेच गुंता गुंत होऊन त्यांच्या मेंदूत रक्ताची गाठ तयार झाली होती. त्यातून उपचारांदरम्यान त्यांचा मृत्यू झाल्याचे केंद्र शासनाच्या आरोग्य विभागाच्या

(उर्वरित पान २ वर)

## वर्ध्यातील तत्कालीन समाज कल्याण अधिकारी पवनकुमार चव्हाण यांची मुंबई येथे जबाबदार पदावर नियुक्ती

* मा. उच्च न्यायालय व मॅट नी पवन कुमार चव्हाण यांचे निलंबन ठरविले अवैध.
* पवन कुमार चव्हाण यांची कार्यासन अधिकारी सरकारी कामगार कार्यालय कुर्ला येथे नियुक्ती, होताच त्यांचे मुळ गाव उपळाई खुर्द तालुका मांढा जिल्हा सोलापुर येथील लोकांनी आनंद केला व्यक्त,
* वर्धा जिल्ह्यात कोरोना काळात तेवीस कोटी रुपये कामगारांना केला वाटप.



**साहसिक वृत्त / ११ नोव्हेंबर**

**मुंबई :** वर्धा जिल्ह्यात कार्यरत तत्कालीन सरकारी कामगार अधिकारी पवन कुमार चव्हाण यांना येथील काही असामाजिक तत्त्वाचा लोकांनी प्रचंड मानसिक त्रास दिला. जो घोटाळा चव्हाण यांनी केला नाही त्या विषयाचा बाऊ करून सदर अधिकाऱ्याला प्रचंड त्रास देण्यात आला. परंतु सत्याचा विजय हा अन्याय, अत्याचार संघर्ष करून मिळतो. याची प्रचिती पवन कुमार चव्हाण यांना आली.

तत्कालीन जिल्हा सरकारी कामगार पदावर असताना येथील भ्रष्टाचारी अधिकारी व काही कामगार संघटनेला हाताशी धरून वर्ध्यातील प्रसिद्ध भामटा यशवंता नामदेव झाडे व त्याच्या सहकाऱ्यांनी पवन कुमार चव्हाण या अधिकाऱ्यावर खोटे आरोप लावून त्यांचे निलंबन केले. परंतु सरकारी कामगार अधिकारी चव्हाण हे सत्य असल्यामुळे त्यांनी निलंबन रद्द करण्यासाठी प्रशासकीय न्यायाधिकरण मॅटमध्ये धाव घेतली. तसेच त्यांच्यावर लावलेल्या खोट्या गुन्ह्यात मा. उच्च न्यायालयात

(उर्वरित पान २ वर)

